2021·22 (VRm) 2021-22

(11)

January 2022 ISBN 978-93-93079-05-3

Smt. Sindhutai Jadhav Maha. Mehkar 330

# ASIAN JOURNAL OF MULTI DISCIPLINARY RESEARCH STUDIES

*Peer Reviewed Multilingual Research Journal*




Chief Editor

Dr. Lahorkar Balaji Rangnathrao

| | | | |
|---|---|---|---|
| 8 | क्रीडा शिक्षण | प्रा. डॉ. संगीता मंगेश खडसे<br>श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान<br>महाविद्यालय मेहकर, जि.बुलढाणा. | 28 |
| 9 | गृह अर्थशास्त्र च्या माध्यमातून स्वयंरोजगार व स्त्री सक्षमीकरण | प्रा. डॉ. वैशाली रा. मोरे<br>गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय<br>मेहकर, जिल्हा बुलडाणा. | 31 |
| 10 | संतांची ईश्वरविषयक संकल्पना | प्रा. डॉ. सविता माधवराव पवार<br>श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान<br>महाविद्यालय, मेहकर. | 35 |
| 11 | ICT Skills and Competencies of Librarians in Colleges of Sant Gadge Baba Amravati University, Amravati | Dr Gajanan Baliram Ghayal<br>Director knowledge resource centre shrimati Sindhutai Jadhav Arts and Science Mahavidyalay Mehkar district Buldhana. | 38 |
| 12 | गणित विषय अध्ययनातून विद्यार्थ्यांत संक्रमित होणारी मूल्य | श्री चव्हाण नवीन लिंबराज<br>सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव,<br>ता. माजलगाव, जि.बीड. | 45 |
| 13 | कोरोना के परिप्रेक्ष्य में : बदल गये दस्तूर | प्रा. धन्यकुमार जिनपाल बिराजदार, सोलापुर,<br>महाराष्ट्र 9423330737 | 47 |
| 14 | लोकसंख्या वाढ भारतीय अर्थ व्यवस्थे समोरील आव्हान | डॉ. धनाजी दगडूराव खेबडे<br>यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,<br>अंबाजोगाई, जि.बीड. | 52 |
| 15 | **Tanqeer Aur Naqqad** | Siraj Anwar Mohammed Miran<br>Secondary Teacher<br>Z.P. High School, Tamsa Nanded. | 55 |

09

# गृह अर्थशास्त्र च्या माध्यमातून स्वयंरोजगार व स्त्री सक्षमीकरण

**प्रा. डॉ. वैशाली रा. मोरे**
**गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख**
**श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय**
**मेहकर, जिल्हा बुलडाणा.**

## प्रस्तावना

स्वयंरोजगार ही आज काळाची गरज आहे. देशात असलेल्या समस्यांपैकी बेरोजगारी ही एक ज्वलंत समस्या आहे. शिक्षणाच्या माध्यमातून विविध स्वयं रोजगार उत्पन्न व्हावेत हे अपेक्षित असते. एकविसाव्या शतकात महिलांनी सुद्धा शिक्षणाच्या माध्यमातून विकासाच्या अनेक संधी पुरुषांच्या बरोबरीने मिळविलेल्या दिसतात. गृहअर्थशास्त्राच्या शिक्षणातून अनेक स्वयंरोजगाराची निर्मिती करता येते .स्वयंरोजगारामुळे आर्थिक प्राप्ती बरोबरच आर्थिक स्वातंत्र्य व त्याचा उपयोग करण्याची संधी प्राप्त होऊन मानसिक समाधान व आनंद मिळविण्यास मदत होते. सक्षमीकरणाच्या दृष्टीने ही बाब महत्वाची ठरते. तसेच देशाच्या प्रगतीसाठी महिला उद्योजक तयार होणे महत्वाचे आहे. गृह अर्थशास्त्र च्या शिक्षणातून गृहिणीच्या ज्ञानाच्या कक्षा विस्तारतात व त्याचा लाभ गृहिणीला जीवनाच्या विविध क्षेत्रातील निर्णय घेताना होतो. स्त्री-सक्षमीकरणात गृहशास्त्राचे शिक्षण अत्यंत महत्वाची कामगिरी बजावत आहे. तिला विविध क्षेत्राचे शिक्षण गृह अर्थशास्त्र च्या माध्यमातून मिळत असते. यापूर्वी गृहिणी स्वतंत्रपणे स्वयंरोजगार निर्मिती कडे सहभागी नव्हत्या. त्या शेतातील व कुटुंबातील कामे करून अप्रत्यक्षरित्या उत्पादनात सहभागी होत्या. परंतु त्यांच्या श्रमाचा, मूल्यांचा संदर्भात विचार करण्यात आलेला नव्हता. आता मात्र गृहिणी उद्योग क्षेत्रात पुढे जाऊ लागल्यामुळे एक उद्योजक म्हणून त्यांची नवीन वैशिष्ट्यपूर्ण ओळख समाजाला होऊ लागली आहे. गृह अर्थशास्त्राच्या शिक्षणामुळे स्वयंरोजगाराला चांगलेच पाठबळ मिळाले आहे.

## गृह अर्थशास्त्राच्या विविधांगी बाजू

वर्तमान परिस्थितीमध्ये गृहिणींना स्वयंरोजगाराची विशेष गरज भासू लागली. जेव्हा तिला जीवन जगण्याचे शिक्षण मिळेल तेव्हाच ती सक्षमपणे उभी राहील. डॉ. राधाकृष्णन यांनी म्हटले आहे "केवळ बौद्धिक भरारी म्हणजे शिक्षण नव्हे तर विविध प्रवृत्ती व भावना मनुष्यात निर्माण व्हायला हव्यात" व हेच काम गृह अर्थशास्त्र करते. गृह शास्त्राच्या माध्यमातून गृहिणीला विविध विषयांचे सखोल ज्ञान मिळते. तसेच गृहिणींना मानसिक पाठबळ देण्याचे कार्य गृह अर्थशास्त्राच्या माध्यमातून होते. स्त्रीला सक्षमीकरणाकडे जाण्याचे बळ मिळते. अर्थार्जनासाठी आवश्यक असलेले शिक्षणही तिला या माध्यमातून मिळते. त्यामुळे तिचे मनोधैर्य वाढत जाते .गृहिणीच्या अंगी असलेल्या गुणांना वाव देणे, त्यांच्याजवळ असलेल्या ज्ञानाचा, वेळेचा त्यांना सुद्धा सदुपयोग करून देऊन त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव ेण्याचे कार्य या माध्यमातून होते. या विषयामुळे त्यांचा स्वयंरोजगार मिळविण्याचा विश्वास वाढलेला दिसून येतो. यातून त्यांना मानसिक पाठबळही मिळते. आहारशास्त्र, आरोग्यशास्त्र ,वस्त्र शास्त्र ,मानव विकास ,उपभोक्ता ग्राहक अर्थशास्त्र, मानवी संबंध ,विस्तार शिक्षण यासारख्या सर्वांगीण बाजूचा अभ्यास गृह अर्थशास्त्र च्या माध्यमातून होतो व त्यामुळेच सर्व

क्षेत्रातील स्वयंरोजगाराच्या व रोजगाराच्या विविध पैलूंची माहिती गृहिणीला मिळते.

## संशोधनाची उद्दिष्टे

* स्त्री सक्षमीकरणाचा अर्थ जाणून घेणे.

*स्वयंरोजगाराचा अर्थ व गृह अर्थशास्त्रातील विविध स्वयंरोजगार यांची माहिती देणे.

* महिला स्वयंरोजगाराच्या कारणांचा अभ्यास करणे.

## महिलांची श्रमशक्ती व आर्थिक स्वयंपूर्णता...

देशातील एकूण श्रमशक्ती पैकी महिलांच्या श्रमशक्तीचे प्रमाण जास्त आहे. फक्त त्याची गणना केली जात नाही. यासाठी महिलांनी शिक्षण ,प्रशिक्षण घेऊन आर्थिक स्वावलंबन केल्यास व उद्योग-व्यवसायात विकास केल्यास त्यांची प्रगती होईल. तसेच महिला ह्या अर्थव्यवस्था, नियोजन, व्यवस्थापन योग्य प्रकारे सांभाळू शकतात याची अनेक उदाहरणे आहेत. ज्या वेळेस भारतीय महिला आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होती तेव्हा समाज व देशात तिला महत्वाचे स्थान प्राप्त होईल. महिलांच्या दृष्टीने स्वयंरोजगार अत्यंत फायदेशीर आहे. कमी भांडवल ,कमी जोखीम व कमी नफ्यातही काही व्यवसाय सुरू करता येतात. महिलांनी केलेले बचत गट व स्वयंपूर्ण गट या आधारे सुरू लघु व कुटीर उद्योग भरभराटीस आलेले दिसतात. यासाठी महिलांना शिक्षण व प्रशिक्षणाची गरज असते .स्त्रियांच्या अंगी उपजतच असलेल्या कलागुण, कौशल्य व क्षमतांना वाव दिल्यास तसेच त्यांना नवीन संधी उपलब्ध करून दिल्यास त्यांचे खऱ्या अर्थाने सक्षमीकरण होईल. महिलांना शिक्षण व प्रशिक्षण यामधून त्या त्या क्षेत्रात कुशल बनविणे ,त्यांना उद्योग व्यवसायाचे संपूर्ण ज्ञान देणे.वेळोवेळी उद्योग, सेवा, व्यापार ,विपणन यांची माहिती, शासकीय विविध योजना, कर्ज उपलब्धता, अनुदान यांची माहिती मिळणे करिता शासनाच्या विविध योजना राबविल्या जातात.

## महिला स्वयंरोजगाराची आवश्यकता

आजच्या काळात कौटुंबिक गरजा एकट्या व्यक्तीच्या कमाईवर पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे स्त्रियांनीही त्याला हातभार लावणे आवश्यक झालेले आहे. नोकरीच्या संधी सर्वांनाच मिळतील याची शाश्वती नसते. त्यामुळे आपल्या शिक्षणाचा, कौशल्याचा व सुप्त गुणांचा विकास करण्याची संधी मिळवून स्वयंरोजगार करणे गरजेचे झालेले आहे .

## वाढती महागाई...

आज वाढत्या महागाईमुळे प्रत्येक वस्तू च्या किमती वाढलेल्या दिसतात. त्यामुळे कौटुंबिक अंदाजपत्रक ही कोलमडतांना दिसते. कुटुंबाचे उत्पन्न व खर्च यांची योग्य सांगड घालण्याकरिता स्वयंरोजगाराची आवश्यकता आहे.

## मर्यादित उत्पन्न

काही कुटुंबाचे उत्पन्न मर्यादित असल्यामुळे कौटुंबिक गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने उत्पन्न वाढविण्याकरिता अर्थार्जनाचा दुसरा मार्ग शोधणे आवश्यक असते. यामध्ये स्त्रियांनी वेगवेगळ्या स्वयंरोजगाराकडे वळल्यास त्यातून कौटुंबिक उत्पन्नात भर घातल्या जाऊ शकते.

## जीवनमानात सुधारणा

आधुनिक काळात प्रत्येक कुटुंबाचा राहणीमानाचा दर्जा बदललेला दिसून येतो. त्यादृष्टीने विविध सोयी

सुविधा मिळविण्यासाठी व कौटुंबिक जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी पैशांची आवश्यकता असते. त्यादृष्टीने ही महिला स्वयंरोजगार आवश्यक आहे

### नोकरीच्या मर्यादीत संधी

नोकरीच्या मर्यादित संधी मुळे रोजगाराच्या क्षेत्रात स्पर्धा चढाओढ दिसून येते. त्यामुळे सर्वांनाच संधी मिळणे शक्य होत नाही. त्यामुळे आपल्या ज्ञानाचा व कौशल्याचा उपयोग करून स्वयंरोजगाराचा मार्ग स्वीकारणे केव्हाही उत्तम ठरते.

### शैक्षणिक पात्रता

नोकरीसाठी शैक्षणिक पात्रता सर्व स्त्रियांकडे असेलच असे नाही. त्यामुळे अर्थार्जनासाठी नोकरीला पर्याय म्हणून स्वयंरोजगार निवडला जातो.

### आर्थिक स्वावलंबन

स्वयंरोजगार यामुळे स्वतःच्या पायावर उभे राहून आत्मविश्वास, आत्मसन्मान व समाजात प्रतिष्ठा मिळविता येते .त्यामुळे खऱ्या अर्थाने सक्षमीकरण होण्याची संधी स्वयंरोजगारमुळे प्राप्त होते. गृह अर्थशास्त्राच्या शिक्षणाद्वारे स्त्रियांना खाली विविध स्वयंरोजगार करता येतात. गृह अर्थशास्त्र विषयाची स्वयंरोजगार दृष्टिकोनातून व्याप्तीवाढती महागाई बेरोजगारी चे प्रत्येक क्षेत्रात वाढते प्रमाण, सतत वाढणाऱ्या गरजा, जीवन स्तर उंचावण्याची इच्छा या सर्व बाबींचा मेळ घालणे एकट्या व्यक्ती करिता तारेवरची कसरत आहे .अशा परिस्थितीत पंडित नेहरू यांनी सुचविल्याप्रमाणे कुटुंब संचलनात आर्थिक सहभाग घेत स्त्रियांनी उचलण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. स्वयंरोजगार भारताच्या विकासात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. विज्ञानाची जीवनाशी सांगड घालणारा उपयोजनशील विषय असल्यामुळे मानवाच्या गरजेची पूर्ती करण्याची क्षमता या विषयात आहे. गृह अर्थशास्त्र विषय शिकलेल्या पदवी व स्नातकोत्तर शिक्षण घेतलेल्या गृहिणी ,विद्यार्थिनी स्वयंरोजगार करू शकतात. तसेच इतरांना ही रोजगाराची संधी उपलब्ध करून देऊ शकतात.

### आहारशास्त्र शाखा व स्वयंरोजगार

आहारशास्त्र व पोषण शास्त्राशी संबंधित स्वयंम रोजगार करता येतो .त्यापैकी खाद्यपदार्थ करून विक्री करणे, दीर्घकाळ टिकणारे पदार्थ तयार करणे, डबाबंद पदार्थ विकणे, आहारोपचार पुरविणे असे अन्य व्यवसायाशी संबंधित सर्व रोजगार करता येतात. तयार खाद्य पदार्थ विकत घेण्याची प्रवृत्ती वाढत असल्यामुळे अशा तयार खाद्य पदार्थांना भरपूर मागणी असते. तसेच प्रसंगानुरूप खाद्यपदार्थ बनवूनही विक्री करता येतात. उदाहरणार्थ : विविध सण समारंभ याप्रसंगी लागणारे पदार्थ, धने पावडर, मसाला ,सुपारी ,रेडीमेड पिठे , इडली दोसा ची पीठे, शेवया, कुरडया, मूगवड्या यासारखे वाळवणीचे पदार्थही फार भाग भांडवल न गुंतवता करता येतात. त्याचबरोबर फळांचे रस ,केचप, लोणची, पापड, जाम यासारखे दीर्घकाळ टिकणारे पदार्थही स्वयंरोजगाराचे एक चांगले माध्यम होऊ शकते .तसेच विविध आजारांमध्ये काही पोषक घटक युक्त ,काही पोषक घटक कमी , कमी मीठ, नियंत्रित साखर ,सौम्य आहार ,पातळ आहार, यासारख्या विविध रोगाच्या अवस्थेतील आहार उपचाराचा पुरवठा करण्याचा स्वयंरोजगार निवडता येतो.

### वस्त्र उद्योग शाखा व स्वयंरोजगार

ड्रेस डिझायनर ,फॅशन डिझायनर म्हणून प्रचलित फॅशन नुसार विविध कपडे डिझाइन करणे .शिवून देणे,

तयार कपड्यांची विक्री करणे, शिवणकाम ,भरतकाम इत्यादी वर्ग चालवणे. ऑर्डरनुसार साड्या, ड्रेसेस ,सोफा कुशन कव्हर वरील भरतकाम करून देणे इत्यादी स्वयंरोजगार मुळे आर्थिक प्राप्ती तर होतेच शिवाय ज्ञान व कौशल्याचा उपयोग होऊन मानसिक समाधान व आनंद मिळवता येतो. तसेच या क्षेत्रात विद्यार्थिनी व स्त्रिया फॅशन डिझायनर म्हणूनही काम करू शकतात. तसेच स्वतःचे बुटीक सुद्धा चालू शकतात.

**गृह व्यवस्थापन कौटुंबिक संसाधने व स्वयंरोजगार**

घर व कार्यालयाची सजावट करणे ,तसेच पुष्परचना, पुष्प सजावट तयार करणे. पुष्परचना ,रांगोळी इत्यादीचे प्रशिक्षण वर्ग घेता येतात .तसेच ऑर्डर नुसार या वस्तू तयार करून देता येतात .गृह अंतर्गत रचना आणि सजावटीचे कामही करता येऊ शकते. मानव विकास व स्वयंरोजगारगृह अर्थशास्त्राचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनी व गृहिणी या माध्यमातून विविध स्वयंरोजगार करू शकतात .उदाहरणार्थ :पाळणाघर सुरू करणे ,बालवाडी चालविणे, बाल समस्या सोडविण्यास पालकांसाठी सल्ला केंद्र, याशिवाय विवाह आणि कौटुंबिक सल्ला केंद्र चालवणे, असे विविध सोयी सुविधा सुरु करून स्वयंरोजगार करता येते. विस्तार शिक्षण व स्वयंरोजगार ह्या विषयाच्या अंतर्गत मिळविलेले ज्ञान ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचवणे हा देखील एक सेवेच्या स्वरुपात स्वयंरोजगार होऊ शकतो. याकरता म्हणून त्यांची शिबिरे ,कार्यशाळा भरवणे, त्यांच्यात जाणीव जागृती निर्माण करणे ही कामे करता येतात. ग्रामीण जनतेत ग्रामीण भागात काम करताना मानधन तत्त्वावर अशा योजना राबविणे हे सुद्धा एक स्वयंरोजगाराची स्वरूप होऊ शकते. आधुनिक पद्धतीत भागातील अर्ज व विविध योजना यांचा लाभ घेण्याकरिता संगणकाद्वारे माहिती मागविली जाते .याकरिता संगणकाचे ज्ञान असल्यास ग्रामीण भागातील जनतेला अशा योजनांचा लाभ करून देणे ,फॉर्म भरून देणे या स्वरूपाचा स्वयम् रोजगार सुरू करता येतो.

**स्वयंरोजगाराचे फायदे**

- फावल्या वेळेचा सदुपयोग होतो.
- कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होते.
- कौशल्याचा विकास होतो.
- स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन आत्मनिर्भर होतात.
- स्त्रियांनी बाजारपेठेत स्थान मिळवून उद्योजकता विकास मदत होते.
- स्त्रियांकरता कमीत कमी व्याजदराने भांडवली कर्ज उपलब्ध होते.

स्वयंरोजगार ही काळाची गरज असून महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने ही आवश्यक व महत्त्वाचे आहे. आपल्या ज्ञान व कौशल्याचा उपयोग करून विविध स्वयंरोजगार करता येतात स्वयंरोजगार मुळे कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न वाढून विविध कौटुंबिक गरजा पूर्ण होऊन मानसिक समाधान व आनंद मिळविता येते .बेरोजगारीची समस्या कमी होऊन मोठ्या उपजीविकेचे पर्यंत प्रवास करता येतो. त्यामुळे राष्ट्राच्या प्रगतीला हातभार लागतो तसेच स्वयंरोजगाराच्या माध्यमातून स्त्री सक्षमीकरण होण्यास मदत होते.

- **संदर्भ ग्रंथ:**


- स्त्री काल आज उद्या -प्रा सिंधू शेवल
- गृहव्यवस्थापन- डॉ. मुंशी डॉ. जठार
- गृहअर्थशास्त्राची मूलतत्वे - लीना कांडलकर
- स्त्री विकासाचे नवे क्षितीज- डॉ.स्वाती कर्वे




Coordinator = IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana